| | | |
|---|---|---|
| | **सायबर सेल, पिंपरी चिंचवड**<br>**पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,**<br>**प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे**<br>**दुरध्वनी क्रंमाक ०२०-२७३५०१२०** | |
| **प्रेसनोट** | **पिंपरी चिंचवड** | **दिनांक - ३१/०८/२०२४** |

# बजाज फायनन्स कंपनीची ७७,२७,८६६/- रु ची फसवणुक करणारे आरोपी राजस्थान व पुणे येथुन सायबर पोलीसांनी घेतले ताब्यात

बजाज फायनन्स ही एक नॉन बँकिंग फायनन्स कंपनी असुन त्यांची शाखा चिंचवड येथे आहे. सदर कंपनी फायनन्स च्या व्यवसायात असुन ग्राहकांना पर्सनल लोन, कन्झ्युमर डयुरेबल लोन, बिझनेस लोन आणि फ्लेक्सी लोन अशा विविध प्रकारची कर्जे देण्याचे काम करते. तसेच बजाज फायनन्स कंपनी पेमेंट व्यवसायात असुन भाडेतत्वावर बजाज पे ईडीसी डिव्हाईस प्रदान करते.

दिनांक १९/०६/२०२४ ते दिनांक १४/०८/२०२४ रोजी दरम्यान बजाज फायनन्स कंपनीचे ऑफिस नंबर २१८,२१९,२२२, तीसरा मजला, गोखले प्लाजा, एलप्रो चौक, चिंचवड येथिल ऑफिसमधुन त्यांच्या कंपनीचे सेल्स एक्झीकेटीव्ह यांच्या मार्फत ज्या प्रमाणे रिक्वेस्ट येतिल त्या प्रमाणे कंपनीकडुन मशिनचे वाटप करण्यात आले होते. त्यानंतर दिनांक ०३ जुलै २०२४ पासुन कंपनीला वेगवेगळया बँकेकडुन चार्ज बँकच्या रिक्वेस्ट येत होते. त्यानंतर त्यांनी त्यांच्या कंपनीच्या सिस्टीमला चेक केले असता वेगवेगळया दुकानात झालेले ट्रान्झेक्शनच्या एकुण ७७,२७,८६६/- रु च्या चार्ज बॅक रिक्वेस्ट प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर त्यांना कंपनीची फसवणुक होत असल्याचे लक्षात आल्याने बजाज फायनन्स कंपनीचे सिनियर एरीया मॅनेजर युवराज चंद्रकांत मोरे यांनी चिंचवड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं ०३२९/२०२४ बी.एन.एस कलम ३१६(२), ३१८(४) माहिती तंत्रज्ञान कायदा २००० कलम ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयाचा तपास चिंचवड पोलीस ठाणे येथे चालु असुन वरिष्ठांचे आदेशाने गुन्हयाचा समांतर तपास सायबर सेल मार्फत सुरु होता.

सायबर सेल कडुन सदर गुन्हयाचा समांतर तपास चालु असताना गुन्हयातील आरोपींनी गुन्हा करण्यासाठी वापरलेले कंपनीच्या ईडीसी मशिन खरेदी करण्यासाठी वापरलेले के.वाय.सी कागदपत्रे यामध्ये देण्यात आलेले अधारकार्ड वरील फोटो व लाईव्ह फोटो हे वेगवेगळे असल्याचे तात्रिक विश्लेषणात निष्पन्न झाले आहे. त्यावरुन तपास केला असता सदर गुन्हयातील आरोपी हे जोधपुर, राजस्थान या ठिकाणी असल्याचे तांत्रिक विश्लेषणात निष्पन्न झाले. त्यानंतर मा. वरिष्ठांचे आदेशान्वये सायबर सेलकडील सपोनि सिमा मुंढे अंमलदार अतुल लोखंडे सौरभ घाटे, प्रितम भालेराव व प्रिया वसावे यांना जोधपुर, राजस्थान येथे पाठविले असता त्यांनी संशयीत आरोपी १) धनश्याम सुखाराम धतरवाल (बिष्णोई) वय-२४, व्यवसाय - ट्रान्सपोर्ट रा. लोणीगाव मोगरा, धतरवालो की धानी, जोधपुर राजस्थान यास शिताफीने ताब्यात घेवून त्याचेकडे कौशल्यपुर्वक तपास करता त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदारांचे मदतीने संगनमताने केला असल्याची कबुली दिल्याने त्यास धनश्याम सुखाराम धतरवाल (बिष्णोई) वय-२४, व्यवसाय - ट्रान्सपोर्ट रा. लोणीगाव मोगरा, धतरवालो की धानी, जोधपुर राजस्थान यास व इतर संशयीत आरोपी नौरतन सिंह सुखदेव राम वय २५ वर्षे, व्यवसाय फुटवेअर रा.- फ्लॅट नंबर १०३, उन्नती सोसायटी, ने-हे दत्तवाडी, पुणे. यांना पुढील तपासकामी चिंचवड पो.स्टे. च्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा. विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. सह पोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, मा. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. संदिप डोईफोडे पोलीस उपआयुक्त, गुन्हे पिंपरी चिंचवड, मा.विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि रविकिरण नाळे, सपोनि प्रविण स्वामी, सपोनि सिमा मुंढे, पोउपनि सागर पोमण, पोहवा दिपक भोसले, पोलीस अंमलदार अतुल लोखंडे, नितेश बिचेवार, सौरभ घाटे, प्रितम भालेराव, स्वप्निल खणसे, अनिकेत टेमगिरे, प्रिया वसावे सर्व नेमणुक सायबर सेल यांच्या पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,
पिंपरी चिंचवड.